स.फौ.ख.नं.३५१/२०२२

**निशाणी क्र. १२ लगत**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव - चेतन चनसुखलाल बोरा,**

वय - ३९ वर्षे, व्यवसाय – कापड दुकान,

रा. भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे

**सरतपास सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री.एस.एस.भांडारकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु-**

**१.** अपघातातील मयत मुलगी अनुष्का हिची आई योगिता अनिल गायकवाड ही आमच्या कापड दुकानात काम करते. सदरचा अपघात हा दि.२०/११/२०२१ रोजी सकाळी ७.४५ वाजता भिगवण येथील संगम वाईन्स समोरील पुणे-सोलापूर महामार्गावर झाला. अनुष्का रस्ता ओलांडत असताना पुण्याकडून सोलापूरकडे जाणाऱ्या क्रेटा गाडी नं.एम.एच./१४/जे.एम./९५०६ ने तिला उडवले. अनुष्काला त्यामुळे डोक्याला व कमरेला गंभीर दुखापत झाली. आम्ही तिला रुग्णवाहिकेने सरकारी दवाखान्यात नेले. तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. मी अपघातावेळी क्रेटा गाडी चालकाला पाहिले होते. त्याचे नाव मंदार दामले आहे. तो आजरोजी न्यायालयात उपस्थित आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस.एन.जगताप यांच्यामार्फत शपथेवर सुरु :-**

**२.** हे खरे की, संगम वाईन्सच्या आजूबाजूला अनेक हॉटेल व दुकाने आहेत.

**३.** हे खरे की, रस्त्यावरुन पादचाऱ्यांना जाण्याकरिता रस्त्यावर पांढरे पट्टे ओढलेले असतात व तेथे दिवे असतात. हे खरे की, संगम वाईन्स पासून आमचे दुकान मुळ बाजारपेठेत दोन ते तीन फर्लांगावर आहे.

४. हे खरे की, संगम वाईन्सपासून पोलिस ठाणे हे अर्धा किमी अंतरावर आहे. हे खरे की, मी अपघाताबाबत पोलिस ठाणेत कळविले नाही अगर फिर्याद दिली नाही.

५. हे खरे की, पुणे-सोलापूर महामार्ग पुर्व-पश्चिम असुन उत्तरेला संगम वाईन्स व दक्षिणेला मयत अनुष्काचे नातेवाईक राहतात. हे खरे की, तो चार पदरी राष्ट्रीय महामार्ग आहे. हे खरे की, तेथे सेकंदाला गाड्या जातात. हे खरे की, त्या रस्त्यावर दुभाजक असुन त्यावर झाडे लावली आहेत. हे खरे की, अनुष्का जिथे पडली होती तिथे पांढरे पट्टे अगर दिवे नव्हते.

६. हे खरे की, पोलिसांनी माझा जबाब घटनेच्या दुसऱ्या दिवशी घेतला. हे खरे की, पोलिसांनी माझा जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे घेतला व मला वाचून दाखविला. माझ्या जबाबातील "मला लहान मुलीचा अपघात झाल्याचे समजले व मी त्या ठिकाणी गेलो" असे लिहिलेला मजकूर चुकीचा आहे. मी पोलिसांना जबाबात हा मजकूर का लिहिला असे विचारले नाही.

७. हे खरे की, अनुष्काची आई बरेच वर्ष माझ्या दुकानात कामाला आहे. हे खरे की, त्यामुळे त्यांचे व आमचे घरगुती संबंध आहेत. हे खरे की, अनुष्काचा अपघात झाल्याचे मी तिच्या वडिलांना कळविले. तसे माझ्या जबाबात नमुद असुन ते बरोबर आहे. हे खरे नाही की, अनुष्का रस्ता क्रॉस करत होती असे मला लोकांकडून समजले. हे खरे की, तसे माझ्या जबाबात नमुद आहे. परंतु मी पोलिसांना हा मजकूर का लिहिला असे विचारले नाही.

प्रश्न- तुम्हाला कथित घटनास्थळी यायला किती वेळ लागला?

उत्तर- मी घटनास्थळीच होतो.

८. हे खरे की, माझ्या जबाबात मी प्रत्यक्ष घटना पाहिल्याचे नमुद नाही. हे खरे नाही की, अनुष्का अचानक झाडामागून आली व तिला शाळेत घाई-घाईने जायचे होते. हे खरे नाही की, तिला टेम्पोने धडक दिली व ती आरोपीच्या गाडीसमोर पडली. हे खरे नाही की, त्यामुळे लोकांचा गैरसमज झाला की, आरोपीने तिला धडक दिली. हे खरे की, सरकारी दवाखाना व पोलिस ठाणे लागुनच आहे. हे खरे नाही की, मला आरोपीच्या गाडीचा नंबर व नाव पोलिसांकडून समजले.

९. हे खरे नाही की, मयत व्यक्तीला क्लेम मिळण्याकरिता आम्ही खोटी केस केली आहे. राष्ट्रीय महामार्गावर साधारण ८० ते ८५ असतो. हे खरे नाही की, अपघात आरोपीमुळे झाला नसुन टेम्पो चालकामुळे झाला.

१०. मी पोलिसांना घटनेदिवशीच माझा जबाब घेण्याकरिता रिक्वेस्ट केलेली नाही. हे खरे नाही की, मयत व्यक्तीच्या घरच्यांशी माझे चांगले संबंध असल्याने मी खोटी साक्ष देतो.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.09.24 11:34:23 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि.२३/०९/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**